भेंडी बाजारामधील खाराटँक रोडवर असलेल्या एका जुन्या इमारतीतून हास्याचा खळखळाट ऐकू येत होता. या घरात शहात्तर वर्षे राहत असलेली मेहताब बहन तिची आवडती कौटुंबिक गोष्ट सांगत आहे. ती तेव्हा बहुतक दहा वर्षांची असावी आणि नेहमी तिच्या चार भावांसोबत चौपाटी बीचवर जात असे. त्याकाळी चौपाटी ते भेंडीबाजरापर्यंतच्या घोडागाडी सफरीसाठी सहा आणे लागत. ''अर्थातच आमची पैसे देण्याची इच्छा नसे,'' ती म्हणाली, आम्हाला फुकट जायचं असे आणि आम्ही बहुतेक तसे जातही असू.''

या खट्याळ मुलांची कार्यपद्धती अगदी सोपी होती. सुमुद्रकिनाऱ्यावर खेळून झाल्यावर ही मुले एक पिशवी वाळूने भरत आणि घोडागाडीत बसत, इब्राहिम रहिमतुल्ला रोडवरील मोहम्मदी मंजिलसमोर थांबली की, ''आम्ही पैसे आणेपर्यंत आमची पिशवी सांभाळ असं घोडेवाल्याला सांगून आम्ही गाडीतुन उतरायचो,'' ती सांगते. त्यानंतर ही मुले मोहम्मदी मंजिलमध्ये जात आणि तेथून चालत शेजारच्या तैयबी मंजिलमध्ये शिरत या दोन्ही इमारती आतून अंगणाने जोडलेल्या आणि समान रस्ता असणाऱ्या होत्या. नंतर तैय्यबी मंजिलच्या प्रवेशद्वारातून बिनदिक्कत बाहेर पडून घरी जात. ''घोडेवाला आमची वाट पाहत आणि आमच्या नावे खडे फोडत बसे. तोपर्यंत आम्ही दुसऱ्या गल्लीतील आमच्या घरी सुरक्षित पोहोचलेलो असायचो.'' मिश्कीलपणे साजिदभाई, मेहताब बहन चे ७२ वर्षाचे धाकटे बंधू म्हणाले, '' आम्हाला माहित असलेला भेंडीबाजार असा होता.''

# निरोप भेंडी

— समीरा खान

(हा लेख ''टाईम आउट:खंड ९ अंक १२'' ०१-०२-२०१३, मासिकातील अंकामधुन लेखकाच्या परवानगीने पुर्नमुद्रीत व अनुवादीत केला आहे.)




# बाजारला

छायाचित्राचे श्रेय : मोनित रजवानी

सैफि बुऱ्हाणी अपलिफ्टमेंट ट्रस्टच्या वतीने भेंडीबाजार पुनर्विकास उपक्रमांतर्गत सुरूवातीलाच जवळजवळ १०० वर्षे जुन्या मोहम्मदी आणि तैय्यबी इमारती काही महिन्यांपूर्वीच उध्वस्त केल्या गेल्या. त्यांची स्वतःची इमारत पाडल्या जाणाऱ्या २८० इमारतींपैकी एक असूनही मेहताब बहनचा दाऊदी बोहरा परिवार भेंडीबाजार पुनर्विकासाच्या विरूद्ध नाही. त्याचे म्हणणे तक्रार म्हणून पाहिले जाईल, या भीतीने आपली नावे उघड करायला ते नाखूष आहेत. वस्तुतः अनेक बोहरा परिवारांना आधुनिक सोईसुविधायुक्त फ्लॅट्स तसेच स्वतःचा मालकी हक्क देऊ करणाऱ्या या उपक्रमाला त्यांचा पाठिंबा आहे. त्याचबरोबर ते आपल्या मोहल्याच्या जुन्या आठवणींना ते घट्ट धरून ठेवू इच्छितात.

भेंडीबाजार हा जुन्या आणि सर्वांत उठून दिसणाऱ्या दक्षिण मुंबईच्या मुस्लिमबहुल भागांपैकी एक आहे. परंतु त्याचे वैशिष्ट्य मुसलमानांपुरतेच मर्यादित नाही. संपूर्ण मुंबईचा विचार करतां, भेंडीबाजार हे ऐतिहासिक व समृद्ध तसेच आर्थिक व सामाजिक योगदानाबद्दल नावाजलेले अशा 'मुळ शहरांपैकी' (Native Towns) एक होते. स्थानिक इतिहासकारांच्या मते भेंडी बाजार हे नाव 'पोर्शिया किंवा भारतीय ट्युलीप वृक्ष (The Spesia Populnea) ज्याला सर्वसामान्यपणे भेंडी या नावाने ओळखतात, व जे एकेकाळी या भागात विपुल प्रमाणात होत असे, त्याच्या लागवडीवरून दिले गेले असावे. फोर्ट भागातील लोकसंख्येची घनता कमी करण्याचे साधन म्हणून वसाहतकार राज्यकर्त्यांनी केलेल्या योजनेनुसार इ.स.१८००च्या आधीच्या काही वर्षांतच (डोंगरी, मांडवी, पायधुणी नागपाडा इत्यादीसह) भेंडीबाजारतही दाट वस्ती वसवली. तेथील लोकसंख्येची घनता आजतागायत तशीच दाट आहे.

१८३९ पर्यंत ते घोड्यांच्या तबेल्यांनी गजबजलेले होते. मुंबईमध्ये पहिल्यांदा जेव्हा गॅस पथदिवे ०७ ऑक्टोबर १८६५ रोजी उभारण्यात आले तेव्हा अग्रक्रमाने उजळून निघणाऱ्या काही रस्त्यांत भेंडीबाजाराचे रस्तेही होते. असे सांगितले जाते की दिवेकरी जेव्हा दिवे लावायला जायचा तेव्हा अफाट जमाव त्याच्यामागे जात असे. 'मुंबईचे वर्णन' या १८६३ मधील उत्कृष्ट मराठी पुस्तकात त्याचे लेखक जी. एन. माडगावकर, भेंडी बाजारात असलेल्या मुस्लिम भटारखान्यांचे किंवा खानावळींचे वर्णन करतात - ''जेथे अरब, मुगल आणि इतर मुस्लिम प्रवासी दोन-चार आण्यांत दररोज जेवतात.'' १९९० पर्यंत मोहल्याने 'भेंडीबाजार घराना' या मुंबईच्या एकमेव मूळनिवासी अभिजात संगीत घराण्याला जन्म दिला होता. भेंडीबाजार घराना हे उत्तर प्रदेशातील बिजनौर येथून आलेल्या तीन संगीततज्ज्ञ भावंडांनी विकसित केले. या घराण्याने अनेकांना प्रभावित केले. लता मंगेशकर, आशा भोसले आणि मन्ना डे ही त्यातील काही नावे आहेत.

त्याचवेळी, इमारती आणि चाळ प्रकारातील निवासस्थाने वाढीस लागली. त्यातील अनेक घरांना लाकडी झडपा असलेल्या खिडक्या बऱ्याचश्या डच दरवाज्यासारख्या, अगदी जुन्या पद्धतीचे लोखंडी जाळीकाम असायचे खाली दुकाने असायची. इथे सर्वकाही विकले जायचे - लेसेस, चामडी बकल, आणि पिशव्या (धाबू स्ट्रिट), मोटारगाड्यांचे सुटे भाग (चिमणा बुचर स्ट्रीट) टोपी आणि 'बारा हंडी' खाद्यपदार्थ (गुजर स्ट्रीट) सिनेमा पोस्टर्स आणि ग्रामोफोन रेकॉर्डस (मटन स्ट्रीट), मूळव्याध आणि इसब यांवरील उपचारासाठी युनानी दवाई (पाकमोडीया स्ट्रिट), तसेच खुसखुशीत मलाई खाजा आणि पत्रेवाला बिर्याणी (खारा टँक रोड), इथे आजही दिसते की एक परिवार तोच एक व्यवसाय मग तो काचवस्तूंचा असो वा हाताने तयार केलेले आईसक्रिम विशेषतः ताज आईसक्रिम) असो, चार-पाच पिढ्या करत आलेला आहे. अशा प्रकारे भेंडीबाजार किरकोळ, घाऊक आणि पुरातन वस्तूंची बाजारपेठ म्हणून नावारूपाला आला.

तरीही, या भागात बरेच बदलही होत गेले आहेत. 'एकेकाळी इथे लाकडाची बत्तीस दुकानं होती. आता फक्त जेमतेम पाच', मोहसिन गुलाम हुसैन लाकडावाला, वय वर्षे सत्तर, हे लाकूडव्यापारी आहेत, ते सांगतात. लाकडावाला यांच्या आजोबांनी रौदत तहेरा स्ट्रिटवर १९१८ मध्ये लाकडाची वखार सुरू केली. प्लायवूड आणि ब्लॉकबोर्डच्या फळ्या मावतील अशी २१ फुट उंचीची ही वखार आहे. 'पुनर्विकासानंतर आमच्या जागेच्या छताची उंची तेरा फूटापेक्षा जास्त नसेल. म्हणजे माझा घाऊक व्यवसाय इथे पूर्णपणे अव्यवहार्य होऊन बसणार आहे,' ते म्हणाले, त्या भागातील त्यांच्या आवडत्या ठिकाणांविषयी बोलत ते पुढे म्हणाले, 'माझं घर, माझी मशीद, माझं लाडकं मिठाईचे दुकान जेथे सुखा दुधी हलवा मिळतो'- आणि जेव्हा त्यांच्या पसंतीचा दही वडावाला दुकान उघडतो तेव्हा आम्हाला परत सायंकाळी सात वाजता येण्याचा सल्ला त्यांनी दिला.

बऱ्याच वर्षापासून हा भाग मुसलमान धर्मातील दाऊदी बोहरा संप्रदायाचे अध्यात्मिक आणि व्यावसायिक केंद्र म्हणून उदयास आला आहे. दाऊदी बोहरा संप्रदाय ही एक आपसात दृढ संबंध असलेली व्यापारी जमात असून आज भेंडी बाजाराचे साठ टक्क्यांपेक्षा जास्त रहिवाशी या संप्रदायाचे आहेत. 'भेंडीबाजार केव्हाच संपला; आता याला फक्त बोहरी मोहल्ला म्हणूनच ओळखतात,' मोहम्मद अस्लम, ज्यांनी मोहसिनभाईच्या वखारीत पस्तिसहून अधिक वर्षे काम केले आहे, ते म्हणाले.

प्रारंभी इ.स.१८०० च्या सुरूवातीच्या काही वर्षात बोहरांनी स्वतःचा, घरोघर किरकोळ वस्तू विकणाऱ्या भटक्या फेरीवाल्यांच्या रूपाने जम बसवला. बोहरा फेरीवाल्यांच्या ''चाऊ-चाऊ'' किंवा किरकोळ वस्तूंच्या पिशवीने जेम्स मॅक्लिअन, जे.एच. स्टॉक्यूलर आणि अमेलिया फॉकलॅन्ड सारख्या कित्येक प्रवाशांना मुंबईला येण्यासाठी भुरळ घातली. नंतर बोहरांनी हार्डवेअर, क्रॉकरी, स्टेशनरी, बूट आणि अत्तर इ. चे आपले स्वतःचे व्यापार उभे केले. त्यांनी छोटी किराणा दुकाने आणि सुया, धागेदोरे इ. किरकोळ साहित्य विकली जाणारी कटलरीची दुकाने उघडली.

सर्वात महत्त्वपूर्ण अशा दाऊदी बोहरा मशिदींपैकी चार मशिदी भेंडी बाजारात आहेत. ह्यात त्यांच्या सर्वात मोठ्या मशिदीचा समावेश असून भव्य अशी सैफी मशीद १९२६ मध्ये भाविकांना खुली करण्यात आली, आणि शुभ्र संगमरवरात उभारलेली सुंदर अशी रौदत तहेरा, मशिद जिथे सय्यद ताहेरा सैफुद्दीन, भूतपूर्व दाइ किंवा दाऊदी बोहरांचे प्रमुख यांची भव्य कबरही आहे.

''भेंडीबाजार हे दाऊदी बोहरा जमातीचे केंद्र आहे - आमच्या सर्व महत्त्वाच्या घडामोडी इथेच होतात,'' झिनत बहन, वय वर्षे चाळीस, म्हणाल्या. झिनत बहन भेंडीबाजारातील एका गल्लीत वाढल्या आणि आता दुसऱ्या एका गल्लीत राहतात. त्या पुढे म्हणतात,''माझ्या बालपणीच्या घरावाचून चुकल्या चुकल्यासारखं वाटेल. इथल्या प्रत्येक कानाकोपऱ्यात आमच्या आठवणी आहेत. इथेच मला रमजानची स्पंदने आणि मोहरमच्या वेळची निष्ठा जाणवते.

झिनत बहनला अपेक्षा आहे की पुनर्विकास योजना पूर्ण झाल्यावर काही वर्षानंतर मोहल्ला पुन्हा पूर्वपदावर येईल. त्या म्हणतात - 'गतकाळातील मोहल्ल्याची मोहकता बदलली तरी उंच, तुकतुकीत इमारती अनेक दशकांपासून असलेल्या जमातीच्या जिव्हाळ्याच्या भावना आणि साहचर्याचे बंध बदलतील, असे मला वाटत नाही. भेंडीबाजार पुन्हा जिवंत होइल.'